# गान - हिराबाई बडोदेकर



(चित्रकार - पं. सुजन राणे)

या वर्षी २० नोव्हेंबरला गानहिरा हिराबाई बडोदेकर यांची पुण्यतिथी आहे. त्या २० नोव्हेंबर १९८९ साली स्वर्गवासी झाल्या. तेंव्हा अशा नावाजलेल्या  शास्त्रीय गायिकेवर लेख लिहिण्याचा मोह आवरत नाही. या लेखाद्वारे सर्वसाधारण वाचकांना व तरुण पिढीतलया गायकांना या गायिकेबद्दल थोडक्यात माहिती मिळावी हा उद्देश आहे. शिवाय मी एक किराणा घराण्याचा गायक असल्यामुळे

व त्या घराण्यातील प्रसिद्ध गवई पं. फिरोझ दस्तूर यांचा जेष्ठ शिष्य असल्यामुळे या घराण्यातील हिराबाईसारख्या थोर गायिकेबद्दल मला अभिमान असणं स्वाभाविक आहे.

हिराबाईंचा जन्म ३० मे १९०५ साली झाला. त्यांचे वडील किराणा घराण्याचे अजरामर गवई खांसाहेब अब्दुल करिम खान होते, तर आई ताराबाई होत्या. लहानपणी त्या चंपाकली म्हणून ओळखल्या जात होत्या. खानसाहेब बडोदा सरकारचे दरबार गवई होते व ताराबाई बडोद्याच्या सरदार माने ( राजमातांचे भाऊ ) यांची कन्या होत्या. बडोद्याच्या गायकवाड महाराजांनी खानसाहेबांना राजदरबारी मैफिली सादर करण्यासाठी ठेवलं होतं, म्हणून ते शिकवण्या करत नसत. परंतु सरदार मानेंच्या सांगण्यावरून त्यांना ताराबाईंची शिकवणी पत्करावी लागली. शिकता शिकता ताराबाई खानसाहेबांच्या प्रेमात पडल्या. परंतु सरदार मानेंच्या विक्षिप्त स्वभावामुळे खानसाहेबाना व ताराबाईना बडोद्यात राहणं कठीण होत गेलं व शेवटी त्या दोघांनी आपला मुक्काम मुंबईला हलवला. एक मुसलमान गवई व त्यांची त्यांची एक हिंदू शिष्या एकत्र राहणं हे त्या काळच्या सामाजिक प्रवृत्तीला धरून नसल्या कारणाने त्यांना विवाहाच्या बंधनाशिवाय दुसरा पर्याय नव्हता. लवकरच त्यांचा विवाह होवून कालांतराने, सुरेशबाबू, कृष्णराव, कमलाबाई, हिराबाई व सरस्वती अशी पांच मुलं झाली. परंतु कांही वैयक्तिक गैरसजुतीमळे खानसाहेब व ताराबाई मुंबईत फार दिवस एकत्र राहू शकले नाहीत व लवकरच निराळे झाले.

ताराबाई स्वभावाने मोठ्या खंबीर होत्या. त्यांनी एकाही मुलाला संगीतापासून वंचित केलं नाही. सुरेशबाबूंना खानसाहेबांकडून चांगली तालीम मिळाली होती व त्यांचा आवाज जात्याच त्यांच्या वडिलांसारखा होता. त्यांची तिलंग रागातली ठुमरी "देखे बिना नाही चैन ... " या विधानाची सत्यता पटवते. हिराबाईना त्यांच्या वडिलांकडून तालीम मिळण्याचं भाग्य लाभलं नाही, परंतु ताराबाई न खचता खानसाहेबांचे पुतणे वाहिद खान यांना गाठून हिराबाईंसाठी त्यांची नियमित तालीम चालू ठेवली. वाहिद खान एखाद्या रागाची बढत कशी करावी हे शिकवण्यात कुशल होते. ह्या बाबतीत एक किस्सा मनोरंजक आहे. जयपूर घराण्याचे विद्वान गवई अल्लादिया खान यांचे पुत्र भुर्जी खान एके दिवशी मुद्दाम वाहिद खानची तालीम ऐकायला गेले असताना, ते एखाद्या रागाचं जाळं कसं विणत असत हे ऐकून थक्क झाले. थोडक्यात वाहिद खानच्या तालमीत हिराबाई चांगल्याच तयार झाल्या. अशी आख्याईका आहे की हिराबाई जन्मल्यानंतर रडल्या नाहीत, पण असं म्हणावं लागेल की त्या जेंव्हा गायला लागलया तेंव्हा त्यांच्या जीवघेण्या सुरांतून श्रोत्यांच्या डोळ्यात अश्रू आलयाशिवाय राहत नसत. अशी त्यांच्या सुरांची किमया होती. सौभद्र नाटकातील "व्यर्थ मी जन्मले

थोर कुळी" "वद जाऊ  कुणाला  शरणा गं". "किती किती सांगू तुला " ही नाट्यगीतं ऐकताना त्या करूण भावांचा भरपूर प्रत्यय येतो.

वयात आल्यावरसुद्धा हिराबाई अतिशय बारीक व रंगाने सावळ्या होत्या. त्यामुळे त्यांच्या रूपात एखाद्याला आकर्षित करण्याचं सामर्थ्य नव्हतं. पण त्यांच्या सुरांत ऐकणाऱ्यांना कायमचं बंदिस्त करण्याची ईश्वरी देणगी होती. १९२३ साली त्या प्रथम मंचावर आल्या व तिकीट लावून गाण्याचे आर्यक्रम सादर करू लागल्या, या बाबतीत त्या पहिल्या स्त्री कलाकार होत्या असं नमूद केलं गेलं आहे.

हिराबाईंच्या आवाजाबद्दल बोलायचं तर असा सुरेल आवाज क्वचितच एखाद्या अन्य गायिकेच्या गळ्यात सापडतो. अत्यंत मृदू, भावनाप्रधान व मुलायम  असा त्यांचा आवाज होता. त्यांचा तार सप्तकातला "सा" शास्त्रीय संगीताच्या जगात प्रसिद्ध होताच पण सर्वसामान्य रसिकांनासुद्धा चांगला परिचयाचा होता. तो तंबोऱ्याच्या सुरात असा कांही  मिसळायचा, की तो त्यांच्या गळ्यातून निघायचा की तंबोऱ्यातून निघायचा हे श्रोत्यांना कळणं कठीण होतं. मुंबईतल्या व्यास संगीतालायचे तज्ज्ञ वसंतराव राजोपाध्याय यांनी आपल्या पुस्तकांत याचा खास उल्लेख केला आहे. तार सप्तकाच्या "सा" ला भिडताना त्या तंबोऱ्यावरील षड्जाची तार जरा मोठ्याने अशा कांही दिमाखाने छेडायच्या, की क्या बात है असं वाटायचं. त्यांच्या सुरेलपणाबद्दल माझा स्वतःचा अनुभव सांगायचा तर कित्तेक वर्षांपूर्वी मी त्यांचं गाणं दादरच्या छबिलदास शाळेत ऐकलं होतं, तबल्यावर प्रसिद्ध तबला नवाझ उस्ताद शमसुद्दीन खानसाहेब होते. हॉलमधलं संबंध वातावरण हिराबाईंच्या सुराने जणू काय न्हाऊन निघत होतं. . रात्री गाणं सम्पल्यावर मी गुणगुणत घरी जात होतो, त्यांच्या सुरांची पकड माझ्या तरुण मनावर एवढी जबरदस्त होती की ती अजून कायम आहे. माझं वय तेंव्हा १८ होतं. त्यांचं एक वैशिष्ट्य सांगितल्याशिवाय राहवत नाही. ते म्हणजे त्या गाताना अत्यंत विनयशील रित्या, खांद्यावरचा पदरसुद्धा नीट करून, डोकं खाली वाकून आपलं गाणं सादर करीत असत. त्यांत वेडावाकडा चेहरा किंवा हातवारे करण्याकडे बिलकूल कल नसायचा.

"सौभद्र" आणि "मानापमान" अशा कांही गाजलेल्या नाटकांत त्यांनी कामं केली होतीच पण "सुवर्ण मंदिर", "प्रतिमा" व "जनाबाई" या बोलपटांतसुद्धा आपल्या भूमिका गाजवल्या. १५ ऑगष्ट १९४७ या स्वातंत्र्यदिनी त्यांना दिल्लीच्या लाल किल्यावर राष्ट्रगीत "वंदे  मातरम" गायचा मान मिळाला होता. संगीत नाटक अकादमी (१९५५), पद्मभूषण (१९७०), विष्णुदास भावे सन्मान, सरोजिनी नायडूनी

दिलेला "गान कोकिला" असे अनेक सन्मान त्यांना लाभले होते. त्यांच्या नावाजलेल्या शिष्या म्हणजे त्यांची बहीण छोटुताई - सरस्वतीबाई राणे, माणिक वर्मा, प्रभा अत्रे, मालती पांडे, जानकी अय्यर ह्या आहेत .

हिराबाईंचा पक्का सूर व त्यांच्या गाण्यातली थोरवी ज्यांना ऐकायची असेल त्यांनी त्यांच्या ध्वनिमुद्रिका जरूर ऐकाव्यात. राग-- यमन, मुलतानी, चंद्रकौंस, रामकाली, बागेश्री, पटदीप, देशकर, तसंच ठुमरी "काहे  पिया बीन  चैन" व होरी "होरी खेलो मोसे नंद" ऐकाव्यात. असं वाटतं हिराबाई गेल्या आणि त्यांच्याबरोबर त्यांचा अद्वितीय सूर कायमचा गेला. तसा सूर परत ऐकण्याचं भाग्य लाभणे कठीण आहे.

**- पं. सुजन राणे**

(पूर्वप्रसिद्धी : एकता -  ऑक्टोबर २०१५, टोरोंटो, कॅनडा )